Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
१४.०५.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १०३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### अखेर मुख्यमंत्रीपदाचा सस्पेन्स संपला



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – केरळच्या मुख्यमंत्रीपदाबाबत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला असून काँग्रेसने व्ही. डी. सतीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. काँग्रेस नेतृत्वाने गुरुवारी (दि.१४) अधिकृत घोषणा करत सतीशन यांची केरळच्या पुढील मुख्यमंत्रीपदी निवड केली. शपथविधी कधी होणार याबाबत लवकरच घोषणा केली जाणार आहे. केरळमध्ये काँग्रेसप्रणीत युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटने डाव्या आघाडीचा पराभव करत सत्तेत पुनरागमन केल्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू होती.

# नीट पेपरफुटी प्रकरणात 'घरकाही भेदी निकला'

## संशयाची सुई फिरली, सीबीआयने लगेच वेगळ्या दिशेने फिरवीली चक्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – नीट पेपर फुटीप्रकरणी आतापर्यंत देशभरात सीबीआयने ६ आरोपींना अटक केली आहे. तर देशभरात अनेक ठिकाणी छापेही टाकण्यात आले आहेत. जयपूरमधून तीन, गुरुग्राममधून एक, नाशिक आणि अहिल्यानगरमधून एक आशा एकूण सहा आरोपींना अटक केली आहे. इतर अनेक संशयितांची चौकशी सुरू आहे. तसेच मोबाईल फोनसह अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि गुन्हेगारी पुरावा दर्शवणारी कागदपत्रे जप्त करण्यात आली आहे. नाशिकमधून शुभम खैरनार, अहिल्यानगरहून धनंजय लोखंडे, जयपूरमधून मांगीलाल बिवाल, विकास बिवाल आणि दिनेश बिवाल तर





गुरुग्राममधून यश यादव अशा एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणासंदर्भात सध्या एक मोठी माहिती समोर येत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाचा तपास करणाऱ्या सीबीआयला खुद्द एनटीए मध्येच काही अनियमितता असल्याचा संशय आहे. छढअ मधीलच एखादी 'अंतर्गत व्यक्ती' संवेदनशील माहिती बाहेर फोडत असल्याचा सीबीआयला तापासातून संशय आला आहे. तसेच, या पेपरफुटीमागे एक सुस्थापित आणि संघटित टोळी कार्यरत असल्याचेही या तपास यंत्रणेच्या निदर्शनास आले आहे. काल, सीबीआयच्या एका पथकाने दिल्लीतील एनटीए कार्यालयाला भेट देऊन या प्रकरणाचा तब्बल दहा तास तपास केला. दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित सर्वात आधी ज्या टोळीचे नाव समोर आले होते, त्या बिहारस्थित टोळीची भूमिका आणि त्यांचे जाळे यांचीही आता पुन्हा नव्याने छाननी केली जात आहे. शुभम खैरनारच्या कार्यालयातून होणार महत्वाचे खुलासे– नाशिकच्या नामांकित कॅनडा कॉर्नर परिसरात नीट पेपर फुटी प्रकरणातील संशयित आरोपी शुभम खैरनारचे वैद्यकीय प्रवेश आणि मार्गदर्शन केंद्र आहे. तो गेल्या दोन ते तीन वर्षांपासून ह्या एस आर एज्युकेशन कन्सल्टन्सी कार्यालयामध्ये विद्यार्थ्यांना ॲडमिशन प्रोसेस मार्गदर्शन आणि संपूर्ण मॅनेजमेंट आणि इतर वैद्यकीय प्रवेशासाठी प्रक्रिया करून देत होता.

# विधानपरिषदेच्या १० नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेले नऊ आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेले एक अशा एकूण १० नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा गुरुवारी विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात दिमाखात पार पडला. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या सर्व नवनियुक्त आमदारांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या शपथविधीसोबतच वरिष्ठ सभागृहातील राजकीय समीकरणे आता अधिक स्पष्ट झाली आहेत. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील वरिष्ठ सदस्य आणि विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. दरम्यान, भाजपने या निवडीतून प्रस्थापित बड्या चेहऱ्यांऐवजी संघटनात्मक बांधणीत सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांना



प्राधान्य दिल्याचे दिसून आले. सुनील कर्जतकर (मराठवाडा), प्रमोद जठार आणि माधवी नाईक (कोकण), संजय भेंडे (विदर्भ) तर विवेक कोल्हे (उत्तर महाराष्ट्र) यांच्या रूपाने भाजपने विभागीय समतोल साधण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला आहे. कोअर कमिटीने पाठवलेली ३० नावांची यादी दिल्लीहून परतल्यानंतर निवडलेल्या या पाच नावांमध्ये प्रादेशिक आणि जातीय समीकरणांचा अचूक मेळ घालण्यात आला आहे.

शपथ घेतलेले नवनियुक्त आमदार डॉ.नीलम गोऱ्हे – शिवसेना, बच्चू कडू – शिवसेना, अंबादास दानवे – उबाठा, डॉ.प्रज्ञा सातव – भाजप, प्रमोद जठार – भाजप, झीशान सिद्दीकी – राष्ट्रवादी, माधवी नाईक – भाजप, सुनील कर्जतकर – भाजप, विवेक कोल्हे – भाजप, संजय भेंडे – भाजप संघनात्मक बळकटीकरणावर भर सुनील कर्जतकर आणि संजय भेंडे यांच्या निवडीतून भाजपने पक्षाची पाळेमुळे ग्रामीण भागात घट्ट करण्यावर भर दिला आहे. तसेच महिला मोर्चाच्या आक्रमक नेत्या माधवी नाईक, पश्चिम महाराष्ट्रातील विवेक कोल्हे आणि कोकणातील प्रमोद जठार यांच्या माध्यमातून संबंधित विभागांत महायुतीची राजकीय ताकद बळकट करण्याचा प्रयत्न पक्षाने केला आहे. शपथविधीनंतर सर्व नवनियुक्त सदस्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विजेचा जोरदार धक्का लागुन युवतीचा मृत्यू

## सुरळी येथील हृदयद्रावक घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथून जवळच असलेल्या सुरळी येथे घराचे बांधकाम सुरु असताना मोबाईल चार्ज करण्यासाठी खिडकीजवळ गेलेल्या १७ वर्षीय विद्यार्थिनीचा विद्युत धक्क्याने (शॉक) लागुन मृत्यू झाला.

जानव्ही किशोर सोनारे असे या मृत युवतीचे नाव असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

प्राप्त माहितीनुसार, जानव्ही किशोर सोनारे ही वरुड शहरातील एन.टी.आर.हायस्कूल येथे शिक्षण घेत नुकतीच इयत्ता



मृतक जानव्ही किशोर सोनारे

दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली होती. सद्य: तिच्या घराचे बांधकाम सुरु आहे. काल बुधवारी सायंकाळी ६:३० वाजताच्या सुमारास जानव्ही ही मोबाईल चार्ज करण्यासाठी घरातील खिडकीजवळ गेली होती. घराचे बांधकाम सुरु असल्याने तिथे विजेचा प्रवाह उतरला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. तिचा खिडकीला स्पर्श होताच तिला विजेचा जोरदार धक्का बसला आणि ती जमिनीवर आदळली, या घटनेत तिच्या डोक्याला गंभिर दुखापत झाली. गंभिरावस्थेत तिच्या कुटूंबियांनी तिला तातडीने शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यावेळी डॉक्टरांनी तिला वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, मात्र उपचारादरम्यान रात्री ७:३० वाजताच्या सुमारास तिची प्राणज्योत मालवली. या घटनेने सुरळी गावामध्ये सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

आज सकाळच्या सुमारास जानव्हीच्या पार्थिवावर स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि गावकऱ्यांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## अमरावती ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

# चिखलदरातून २५ लाखांची अवैध विदेशी दारु जप्त, ६ जणांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चिखलदरा** – मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात होणाऱ्या अवैध दारू तस्करीला आळा घालण्यासाठी अमरावती ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटांग मार्गावर सापळा रचून पोलिसांनी तीन आलिशान कारसह तब्बल २५ लाख ३२ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, ६ आंतरराज्यीय तस्करांना बेड्या ठोकल्या आहेत.

मध्यप्रदेशच्या सीमेवरून अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विदेशी दारूची तस्करी होत असल्याच्या तक्रारी पोलीस



अधीक्षक निकेतन कदम यांना मिळाल्या होत्या. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक १२ मे रोजी चिखलदरा परिसरात गस्तीवर असताना, गुप्त बातमीदाराकडून घटांग मार्गे दारूची वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी घटांग मार्गावर नाकाबंदी केली. यावेळी एकापाठोपाठ येणाऱ्या तीन संशयास्पद कारना थांबवून त्यांची झडती घेतली असता, एका कारमध्ये 'ऑफिसर चॉईस' कंपनीच्या विदेशी दारूचे ४५ बॉक्स (४,३२० बॉटल्स) मिळून आले. या दारूची किंमत ३ लाख ७१ हजार ५२० रुपये आहे. विशेष म्हणजे, दारू असलेल्या कारला इतर दोन कारमधून 'पायलेटिंग' (रस्ता मोकळा असल्याचे सांगणे) केले जात होते.

अटकेतील आरोपी: राजू संपतराव जनबंधु (मेमना, चिखलदरा), किशोर रामाजी इंगळे (मुलताई, बैतुल, म.प्र.), अभिषेक रामकिशोर गुप्ता (भैसदही, म.प्र.), राजू ओमप्रकाश शिवहरे (भैसदही, म.प्र.), रामचंद्र धनपाल अमृते (भैसदही, म.प्र.), विजय शिवचरण यादव (भैसदही, म.प्र.) जप्त केलेला मुद्देमाल: विदेशी दारू: ३,७१,५२० रुपये (४५ बॉक्स) टोयोटा कार, महिंद्रा बोलेरो आणि अन्य एक कार रोख रक्कम: १,००,२५० रुपये, मोबाईल: ६ संच, एकूण किंमत: २५,३२,७७० रुपये सदर आरोपींविरुद्ध चिखलदरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

यांनी केली कारवाई: पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, पीएसआय सागर हटवार, रवींद्र बावने, गजानन दाभने, भूषण पेठे, पंकज फाटे आणि चालक नईम शहा यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

# अल्पवयीन गर्लफ्रेंडने स्वत:चेच नको-नको ते व्हिडीओ केले व्हायरल

## बॉयफ्रेंडने फोन न उचलल्याने संतापली, कोल्हापूर हादरलं!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**कोल्हापूर** – कोल्हापूरमधील शिरोळ तालुक्यातील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रियकर फोन उचलत नसल्याच्या रागातून अल्पवयीन मुलीने स्वत:चे प्रियकरासोबतचे अश्लील व्हिडीओ व्हायरल केले. सदर घटनेनंतर कोल्हापूर हादरलं आहे.

प्रियकर टाळाटाळ करत असल्याच्या रागातून अल्पवयीन मुलीने व्हिडीओ




व्हायरल करण्याचे टोकाचे पाऊल उचललेले. सदर मुलीने प्रियकरासोबत असलेले तीन अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल टाकले. या घटनेनंतर संबंधित तरुणावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून शिरोळ पोलिसांनी तरुणाला अटक केली आहे. तसेच व्हिडीओ चित्रित करण्यात आलेल्या लॉजच्या मालकाची देखील चौकशी करण्यात येणार आहे. पुण्यातही धक्कादायक घटना– पुण्यात आईच्या प्रियकराचा मुलीच्या प्रियकराने खून केल्याची घटना काळेपडळ येथे घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सराईत गुन्हेगारासह सहा जणांना अटक केली आहे. प्रेमसंबंध तोडण्यासाठी तरुणीच्या आईच्या प्रियकराने टाकलेला दबाव आणि त्याने दिलेल्या धमकीमुळे त्याचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना हडपसरमधील काळेपडळ परिसरात घडली.



# ‘२२ वर्षांपासून राजकारणात, ५४ दौऱ्यांवर ६० कोटींचा खर्च, यांना निधी पुरवतंय कोण?’

## राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांवर संबित पात्रांकडून प्रश्नांची सरबत्ती

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – भारतीय जनता पक्षाचे खासदार संबित पात्रा यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांबाबत अनेक दावे केले आहेत.

राहुल गांधी गेल्या २२ वर्षांपासून निवडून आलेल्या पदावर आहेत आणि या काळात त्यांनी अनेक परदेश दौरे केल्याचे पात्रा म्हणाले. राहुल गांधी यांनी आजपर्यंत अंदाजे ५४ परदेश दौरे केल्याचा दावा पात्रा यांनी केला. या दौऱ्यांमध्ये इटली, युनायटेड किंगडम, अमेरिका,



मालदीव, कतार, मस्कत आणि ओमान यांसारख्या देशांच्या भेटींचा समावेश आहे. त्यांनी दावा केला की, यापैकी बहुतेक दौऱ्यांची नोंद सार्वजनिकरित्या उपलब्ध असून, माहिती, छायाचित्रे आणि प्रवासाचा तपशीलही उपलब्ध आहे. राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांवर प्रश्नचिन्हसंबित पात्रा यांनी राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, भारतातील सर्वात मोठ्या विरोधी पक्षाचे मुख्य नेते राहुल गांधी जवळपास २२ वर्षांपासून खासदार आहेत. या २२ वर्षांत त्यांनी किती वेळा परदेश दौरा केला आहे? अशी विचारणा केली. राहुल गांधींनी ५४ वेळा परदेश दौरा केला संबित पात्रा म्हणाले की, आतापर्यंत जाहीर झालेल्या आणि सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, राहुल गांधींनी ५४ वेळा परदेश दौरा केला आहे.

### दिनविशेष

**१४/०५/१९४० : दुसरे महायुद्ध – हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.**

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –१५७३५० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – १४७१६०रु.(१०ग्रॅम)

चांदी – ३,३०,३०० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६०० | २००० |
| गहू | २२०० | २५०० |
| तूर | ७५०० | ८०५५ |
| मूग | ६८०० | ७२५० |
| उडीद | ६००० | ७००० |
| हरभरा | ५२०० | ५५५६ |
| सोयाबिन | ६८०० | ७३४६ |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | ७५०० | ८१०० |
| भुईमूग | ६५०० | ७५७५ |
| मका | १७५० | १८५० |

# नागपूर विमानतळाच्या आधुनिकीकरणाला केंद्राची मंजुरी

**३० वर्षांच्या भाडेपट्ट्यामुळे विकासाचा मार्ग मोकळा**

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नागपूर*** – नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरण आणि अद्ययावतीकरणाला केंद्र सरकारने मोठी मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने हा प्रकल्प सार्वजनिक–खाजगी भागीदारी तत्त्वावर राबवण्यास हिरवा कंदील दाखवला आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने मिहान इंडिया लिमिटेडला दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्ट्याची मुदत ६



ऑगस्ट २०३९ नंतरही वाढवण्यात आली आहे. या मुदतवाढीमुळे प्रकल्पासाठी आवश्यक कायदेशीर आणि प्रशासकीय अडथळे दूर झाले असून विकास प्रक्रिया वेगाने सुरू होण्याची अपेक्षा आहे.

मिहान प्रकल्पाला मिळणार मोठी चालना महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. नागपूरला मध्य भारतातील प्रमुख विमान वाहतूक आणि मालवाहतूक केंद्र बनवण्याचे उद्दिष्ट या प्रकल्पामागे आहे. या निर्णयामुळे विदर्भातील उद्योग, लॉजिस्टिक्स आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.

३ कोटी प्रवाशांची वार्षिक क्षमता माध्यमातून विमानतळाचे जागतिक दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज रूपांतर केले जाणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विमानतळाची अंतिम वार्षिक क्षमता ३ कोटी प्रवाशांपर्यंत पोहोचेल. यामुळे केवळ प्रवासी सेवा सुधारतील असे नाही, तर कार्गो हाताळणी क्षमता आणि आर्थिक पायाभूत सुविधाही अधिक मजबूत होतील.

विदर्भाच्या विकासाला नवे बळ या प्रकल्पामुळे नागपूर आणि संपूर्ण विदर्भ प्रदेशातील कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी सुधारणा होईल. खाजगी गुंतवणूक आणि सरकारी देखरेखीच्या संगमातून प्रवाशांना आधुनिक सुविधा आणि अधिक दर्जेदार सेवा मिळतील.

# गाजावाजा करून भूमिपूजन, वर्ष लोटलं तरी काम अर्धवट, आमदार मेघेंनी उरकलेलं ‘ते’ कार्य फक्त निवडणुकीसाठीच?

## बेजबाबदार कंत्राटदार, नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे नागरिक हैराण

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नागपूर*** – ‘सरकारी काम आणि अनेक महिने थांब‘ ही सरकारी कामाची पद्धत वाडी नगरपरिषद अंतर्गत ॲटोमिक एनर्जी डेपो रोडच्या बांधकामात तंतोतंत पाळली जात आहे. कारण अवघ्या ४०० मीटर लांबीच्या या रस्त्याचे बांधकाम गेले सहा महिने सुरू आहे. गेल्या वर्षी आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत नगर परिषद.

निवडणुकीच्या आचारसंहितेच्या अनेक महिने पूर्वीच मोठा गाजावाजा करून सिमेंट रोडच्या कामाचा भूमिपूजन करण्यात आला होता.भूमिपूजन नंतर ही कंत्राटदाराने अनेक महिने कामाला सुरुवातच केली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये हे फक्त निवडणुकीपुरते भूमिपूजनाचे फार्स होते की काय अशी भावना निर्माण झाली होती.

कधी चार दिवस काम व्हायचे, नंतर पंधरा दिवस काम बंद मात्र दिवाळी जवळपास प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. अत्यंत हळुवार गतीने अवघ्या ४०० मीटर रस्त्याचे टप्प्याटप्प्याने सिमेंटकरण करण्यात आले.



कधी चार दिवस काम व्हायचे, नंतर पंधरा दिवस काम बंद राहायचे. या काळामध्ये सिमेंटिकरणाच्या नावाखाली रस्ता अर्धवट अडवून ठेवण्यात आल्यामुळे परिसरातील रहिवाशींना अनेक त्रासांना सामोरे जावं लागत होतं. मात्र एकदा सिमेंट रस्ता तयार होऊन सर्व त्रास संपतील, या भावनेने या भागातील नागरिक विकासाच्या अशा प्रसव वेदना सहन करत राहिले.

होळीमध्ये तर जवळपास महिनाभर काम बंद होता. परराज्यातील मजूर गावी चालले गेले, ते परत आले नाही असं तकलादू कारण सांगून कंत्राटदाराने तेव्हा महिनाभर काम बंद ठेवून नगरपरिषद तसेच स्थानिक नागरिकांची अडवणूक केली आतापर्यंत फक्त २०० मीटर सिमेंट नाली बांधली अनब... कसं बस सिमेंटटीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर ही कंत्राटदाराने नियमाप्रमाणे शेजारी बांधावी लागणारी सिमेंटची नालीचं काम बरेच दिवस सुरूच केलं नाही.

सुमारे महिनाभरापूर्वीपासून सिमेंट नाली बांधण्याचे काम सुरू केले असले, तरी आतापर्यंत फक्त २०० मीटर सिमेंट नाली बांधून पुन्हा एकदा काम बंद ठेवण्यात आले आहे. या परिसरात लोकांचे वैयक्तिक रो हाऊस सदृश्य घर आहेत. लाईफस्टाईल सोसायटी लेखी सोसायटी सारख्या मोठ्या निवासी संकुल आहे. तसेच फेडरल बँक सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि आयडिया कंपनीचे मोठे कार्यालय ही आहे.

आधीच्या डांबरी रस्ताच्या तुलने सिमेंट रोड ची उंची बरीच वाढल्यामुळे या भागातील घरांमध्ये जाण्यासाठी नागरिकांना अर्धवट नालीवर ठेवलेल्या लाकडी पाटीचा वापर करून त्यावरून सर्कस करत जावं लागत आहे.

# तामिळनाडूत पुन्हा एकदा ट्विस्ट? थलपती विजय यांचे कट्टर विरोधक स्टॅलिन यांची तृषा कृष्णनला १२ कोटींची ऑफर

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**चेन्नई** – तामिळनाडूच्या राजकारणात एकीकडे नवनिर्वाचित मुख्यमंत्री थलपती विजय आणि दुसरीकडे प्रसिद्ध अभिनेत्री तृषा कृष्णन हिची चर्चा रंगली आहे.

थलपती विजय यांच्या घटस्फोटाच्या चर्चा रंगलेल्या असतानाच त्यांच्या पत्नीनं त्यांच्यावर अभिनेत्रीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचे आरोप लावले. याबाबत चर्चा सुरू असतानाच अनेकदा थलपती विजय आणि तृषा कृष्णन एकत्र दिसून आले आणि दोघांच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आलं. अशातच थलपती विजय यांच्या शपथविधी सोहळ्यात पारंपरिक लूकमध्ये मिरवणाऱ्या तृषा कृष्णननं सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. तेव्हापासूनच ती चर्चेत आहे. अशातच आता एक बातमी समोर आली आहे.

जिनं तमिळ सिनेसृष्टीत मोठी खळबळ उडवून दिलीय. थलपती विजयचे राजकीय प्रतिस्पर्धी उदयनिधी स्टॅलिन यांनी तृषा कृष्णन हिला १२ कोटी रुपयांची भरघोस ऑफर दिल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे जोरदार चर्चांना उधाण आलंय.

# न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थीनी पुर्वा मेश्राम रसायनशास्त्रात तालुक्यातुन प्रथम

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – न्यु इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथील बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून विज्ञान शाखेतील पुर्वा स्वप्निल मेश्राम हिने रसायनशास्त्र विषयात ८९ गुण मिळवित उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे.पुर्वा स्वप्निल मेश्राम हिने रसायनशास्त्र विषयात ८९ गुण मिळवित तालुक्यात विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. पुर्वा मेश्राम हिला मिळालेल्या यशाचे सर्व श्रेय तिने तिचे आई–वडील व विद्यालयाचे



प्राचार्य अश्विन पोच्छी, समन्वयक टी.सी.सायर, कमवि इन्चार्ज किरण कडु, विषय शिक्षक शृंगारे, सर्व शिक्षक, शिक्षिका यांना दिले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने विद्यार्थीनीचे अभिनंदन करण्यात आले.

# पोपटांच्या वाढत्या त्रासामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**शेतकऱ्यांची प्रशासनाकडे मदतीची मागणी**

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**चांदस वाठोडा** – तालुक्यातील अनेक शेतांमध्ये पोपटांच्या मोठ्या थव्यांमुळे ज्वारी पिकाचे मोसंबीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. सकाळी व संध्याकाळी मोठ्या संख्येने पोपट शेतात येऊन पिक खाऊन टाकत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढले आहे.

शेतकऱ्यांनी



सांगितले की, दिवस–रात्र शेतात राखण करूनही पोपटांचा त्रास कमी होत नाही. यामुळे मेहनतीने घेतलेले पीक वाया जात असून उत्पादनावर मोठा परिणाम होत आहे.

संबंधित वन विभाग व कृषी विभागाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी खुशाल साबळे वाठोडा येथील मौजा मुसळखेडा व इतर शेतकऱ्यांनी केली आहे तसेच पोपटांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना करण्यात अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

स्थानिक प्रशासनाने या समस्येकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील शेतकरी करत आहेत.

**श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त**

# विविध सामाजिक आणि सेवाभावी उपक्रम

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – परम पुज्य श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने विविध सामाजिक आणि सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतुन मानवतेचा संदेश देत गुरुदेवांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, या अंतर्गत ग्रामीण रुग्णालयामध्ये असलेल्या रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

वाढदिवसाचे औचित्य साधुन मोक्षधाम येथील रहिवासी प्रभा माटे यांना आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार तर्फे एक महिन्याचा संपुर्ण किराणा भेट देण्यात आला.

येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. रुग्णांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, या हेतुने आणि गुरुदेवांच्या आशीर्वादाने हा उपक्रम राबविण्यात आला. गेल्या काही



दिवसांपासून सुरु असलेल्या आर्ट ऑफ लिव्हिंगच्या शिबिराची सांगता देखील याच शुभमुहूर्तावर पार पडली. या शिबिरामुळे शहरात आणि साधकांमध्ये अत्यंत चैतन्यमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत तणावमुक्त जीवनाची गुरुकिल्ली आत्मसात केली.

या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वरुड केंद्रातील सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. याप्रसंगी प्रशिक्षिका नैना होले, आर्ट ऑफ लिव्हिंग जिल्हा कॉन्स्लि मेंबर अशोक नानोटकर, डॉ.चरण सोनारे,



लोकेश अग्रवाल, प्रशिक्षक विजय अढाऊ, नरेश बघेल, राजु घाटोळे, अजिंक्य खेरडे, लोकेश अग्रवाल, रुपेश भोयर, शिबिरार्थी सारंग यावलकर, मिनल सोनारे, निलेश तरुडकर, गोपाल मालपे, वैशाली चामलाटे, मोनाली राऊत, चंदा भड, नंदकिशोर पाटील, स्वप्नील रानोटकर, निळकंठ ढोक, चंद्रकांत भड, मंजुश्री भड, वर्षा सोनारे, हर्षल इंगोले, डॉ.अमोल कोहळे, जितेंद्र शिंगरवाडे, डॉ.राहुल भुतडा, प्रतिभा खासबागे, लोकेश वंजारी, उध्दवराव फुटाणे, डॉ.प्रविण ठाकरे, डॉ.श्रृतिका ठाकरे, भावना लांडे, प्रविण खरे, विलास रायचुरा, किरण रायचुरा, धिरज माळोदे, आदित्य घाटोळे, जितेंद्र शिंगरवाडे, तुषार खेरडे, सानिका पाटील यांचेसह अन्य उपस्थित होते.

# संपादकीय

## आनंदी राहण्याची कला म्हणजे सर्वस्व स्विकारण्याची क्षमता

### बधिर व्यवस्था आणि कोमेजलेली फुले: शक्ती कायद्याची प्रतीक्षा कधी संपणार?

महाराष्ट्राच्या मातीला संतांची आणि समाजसुधारकांची मोठी परंपरा आहे. पण आज याच मातीत उमलण्यापूर्वीच कोमेजून जाणाऱ्या चिमुरड्या कळ्यांची संख्या पाहिली, तर ही परंपरा आपण जपतोय का, असा प्रश्न पडतो. दर ५३ मिनिटांनी महाराष्ट्रात एक मूल अत्याचाराला बळी पडते, ही आकडेवारी केवळ सरकारी कागदावरील संख्या नसून आपल्या सामाजिक आरोग्याचा बिघडलेला अहवाल आहे. नुकतीच नसरापूर येथे घडलेली घटना म्हणजे या क्रूरतेचा कळस आहे. एका चिमुरडीचा जीव केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे गेला नाही, तर त्यामागे आपली अधुरी न्यायव्यवस्था, रखडलेला शक्ती कायदा आणि एकूणच समाजाची बधिरता कारणीभूत आहे. पाशवीपणाची सीमा आणि व्यवस्थेचे अपयश नसरापूरची घटना ही पहिली नाही आणि दुर्दैवाने, जर आपण वेळीच जागे झालो नाही तर ती शेवटचीही नसेल. जेव्हा एखादी अशी घटना घडते, तेव्हा समाजात संतापाची लाट येते, मेणबत्ती मोर्चे निघतात आणि काही काळ सोशल मीडियावर हॅशटॅग चालवले जातात. मात्र, ज्या वेगाने हा संताप येतो, त्याच वेगाने तो ओसरतोही. या चिमुरडीचा प्राण जाण्याला केवळ तो नराधम जबाबदार नाही, तर ती बधिर व्यवस्था जबाबदार आहे जिथे गुन्हेगाराला कायद्याचा धाक उरलेला नाही. गुन्हेगार निर्धास्त आहेत कारण त्यांना माहित आहे की, कायद्याच्या पळवाटा शोधून आपण वर्षानुवर्षे तुरुंगात राहू शकतो किंवा पुराव्याअभावी सुटू शकतो.

शक्ती कायदा: कागदावरची वाघ की प्रत्यक्ष शस्त्र?

आंध्र प्रदेशच्या 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'शक्ती कायदा' आणण्याची घोषणा मोठ्या थाटामाटात करण्यात आली होती. महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये जलद गतीने तपास करून गुन्हेगाराला फाशीपर्यंतची शिक्षा देण्याची तरतूद यात आहे. पण प्रश्न असा आहे की, हा कायदा अद्याप पूर्ण ताकदीने प्रत्यक्षात का आला नाही? अधुरी अंमलबजावणी: कायदे बनवणे सोपे असते, पण त्याची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारी यंत्रणा आजही अपुरी आहे. राजकीय अनास्था: अनेकदा अशा संवेदनशील कायद्यांचे राजकारण होते. श्रेयवादाच्या लढाईत सर्वसामान्यांचा न्याय मात्र भरडला जातो. न्यायदानाचा विलंब: 'जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाईड'. पोक्सो अंतर्गत दाखल झालेले हजारो खटले आजही प्रलंबित आहेत. सामाजिक बधिरता: आपण कुठे कमी पडतोय? केवळ सरकारला दोष देऊन चालणार नाही. समाज म्हणून आपणही तितकेच जबाबदार आहोत. आपल्या आसपास घडणाऱ्या संशयास्पद हालचालींकडे आपण 'आपल्याला काय त्याचे?' या वृत्तीने पाहतो. विकृत मानसिकता: इंटरनेटचा

# आंबेडकरी चळवळीला जिवंत ठेवल्याबद्दल धन्यवाद बाळासाहेब



बाबासाहेब आंबेडकर आणि बाळासाहेब आंबेडकर हे सत्तेपासून कायम दूर राहिले आहेत हे वर वर जरी दिसत असलं तरी त्यांना जाणीवपूर्वक सत्तेपासून दूर ठेवण्यात आल आहे.किंबहुना त्यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी षडयंत्र रचल्या गेलेली आहेत. जेथे ज्यांना एक ईमानदार आंबेडकर पचवता आला नाही. तिथे हे दुसरा ईमानदार आंबेडकर कसे पचवू शकले असते? बाबासाहेबांच्या वेळी आणि बाबासाहेबांच्या नंतर काँग्रेस आणि तत्सम नेत्यांचा हा राजकीय खेळ राहला आहे. बाबासाहेब आंबेडकरांना कायम राजकीय विजनवासात ठेवत त्यांना पर्याय म्हणून बाबू जगजीवनराम यांना पुढे करण्यात आले. तर गवई, कवाडे, आठवले यांच्या सारखी काही प्यादे बाळासाहेब आंबेडकरांना पर्याय म्हणून हेतुपुरस्कर गेली ४० वर्षे कायम सत्तेत ठेवली गेलीली आहेत. आणि आंबेडकरी चळवळीच्या नावावर खपवल्या गेलेली आहेत. त्या प्याद्यांनी सत्तेत राहून आंबेडकरी चळवळीसाठी कोणते दिवे लावलेत? या गोष्टी सर्वश्रुत आहेत.त्यांच्या पेक्षा सत्तेच्या बाहेर राहून किती तरी मोठी-मोठी आंदोलने बाळासाहेबांनी उभी केली. चांध्यापासून बांध्यापर्यंत चळवळ बांधली. बौद्ध वाड्या-वस्त्यांपूर्ती आंबेडकरी चळवळ सीमित न ठेवता तमाम बहुजनांपर्यंत वंचितांपर्यंत चळवळ पोहोचवली, वंचितांच्या शोषितांच्या पाठीमागे खंबीरपणे चळवळ उभी केली. वंचितांसाठी शोषितांसाठी कायदेशीर लढे लढून देशव्यापी भूमिका घेतल्या. जिथे ईडी, सीबीआयच्या वापरामुळे विरोधकांच्या तलवारी म्यान होतात. तिथून बाळासाहेब आंबेडकर कोणतेही पद नसतात निडरपणे सत्ताधाऱ्यांना जाब विचारतात. इथेच आंबेडकरी चळवळीच्या ताकदीचे आणि वैचारिक प्रगल्भतेचे प्रमाण मिळते. ज्याच्यावर आज आंबेडकरी चळवळ गेली ४० वर्षे झाले टिकून आहे. तसेही आंबेडकरी चळवळीला वैचारिक संघर्षातून चळवळ चालण्यासाठी बाबासाहेबांच्या नंतर एक वैचारिक प्रगल्भता असलेल्या निर्भीड नेत्याची गरज होती. ती बाळासाहेबांनी भरून काढली. आणि त्याच भरोष्यावर आज आंबेडकरी चळवळ ही डौलान उभी आहे. कारण आंबेडकरी चळवळ नुसतं सत्ता मिळवण्याची चाबी नसून बुद्ध, कबीर, शिव, शाहू, फुले यांच्या मानवतावादी विचाराचा जागर करणारी चळवळ आहे. सत्ता कारणासाठी आंबेडकरी चळवळीची व्याख्या करायची झाल्यास 'समतावादी विचारातून सत्ता मिळवून सत्तेचे विकेंद्रीकरण करत प्रत्येक घटकापर्यंत समता, बंधुता, न्याय, समान हक्क, समान संधी पोहोचवण्याची तळमळ असलेला विचार म्हणजे आंबेडकरी चळवळ होय!'. राजकारणात राहून बाबासाहेबांनी ज्याप्रमाणे स्वतःची इंटेलेक्च्युअल ऑनेस्टी जपली तस तत्कालीन कोणत्याही नेत्याला जमले नाही. अगदी त्याचप्रमाणे गेली ४० वर्षे राजकारणात राहून बाळासाहेबांनी स्वतःची इंटेलेक्च्युअल ऑनेस्टी जपली याचाच आंबेडकरी चळवळीच्या प्रत्येक ईमानदार कार्यकर्त्याला खूप मोठा अभिमान आहे. त्यामुळे सत्ता असो नसो आमच्या बापाने जे मिळवलं ते संघर्षातून, वैचारिक विद्वत्तेतून कमावलेल्या प्रामाणिकपणाच्या आणि स्वतःच्या मनगटाच्या भरोश्यावर मिळवलं! तेच आम्ही करू! शेवटी सत्तेपेक्षा विचार आणि त्या विचाराची चळवळ करणे महत्वाची गोष्ट आहे. तसेही आंबेडकर हे नाव जातीच्या आणि धर्माच्या राजकारणावर पोट भरून जगणाऱ्या राजकारण्यांसाठी आऊट ऑफ सिल्याबस राहिलेले आहे. बाबासाहेब जिवंत असताना यांना कळले नाहीत. आणि आज बाबासाहेबांच्या फोटोशिवाय कोणाचच भागत नाही. याचा अर्थ सर्वांना बाबासाहेब कळायला उशीर लागला. हे जितक कटु सत्य आहे त्याच प्रकारे बाळासाहेब कळायला देखील उशीर लागत आहे.कारण आंबेडकर हे फक्त एक नाव नसून जिवंत विद्यापीठ आहे. त्यामुळे संपूर्ण विद्यापीठ समजणं एखाद्या अभ्यासक्रमावर दिलेल्या सिल्याबस एवढं सोप नसतं. त्यामुळेच वैचारिक दिवाळखोर लोकांसाठी आंबेडकर हे कायम आऊट ऑफ सिल्याबस राहिले आहेत आणि राहतील. कारण आंबेडकर कळायला खूप अभ्यास लागतो. आणि अभ्यास केल्यानंतरही त्यांच्या विचाराचे समर्थन करायला बौद्धिक प्रामाणिकपणा लागतो. धन्यवाद बाळासाहेब तुमच्या गेल्या ४० वर्षाच्या इमानदारी च्या राजकारणातून किंबहुना आंबेडकरी चळवळीच्या विचाराला अभिप्रेत राजकारणातून आजच्या आमच्या नव्या पिढीला पुन्हा तुमच्या रूपाने बाबासाहेब पाहायला मिळाले. आणि तुमच्याच मुळे आज आंबेडकरी चळवळ जिवंत आहे आणि आपला स्वतंत्र बाणा टिकवून आहे. तुमच्या intelectual honesty ला सलाम...बाळासाहेब...! दीर्घायुषी व्हा.. वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा...!

**डॉ.संघरक्षित गोपनारायण**
अकोला, मो.७३८७९६३२३९

# जागतिक ताण-तणाव दिन

जागतिक ताण-तणाव दिन दरवर्षी १६ एप्रिल रोजी साजरा केला जातो. आजच्या धावपळीच्या युगात 'ताण' हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. कामाचा व्याप, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक ओढाताण आणि स्पर्धेचे युग यामुळे लहानांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या तणावाखाली वावरत आहे. हा तणाव जेव्हा मर्यादेबाहेर जातो, तेव्हा त्याचे रूपांतर गंभीर शारीरिक आणि मानसिक आजारांत होते. याच धोक्याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

ताण-तणावाची कारणे आणि परिणाम तणावाची कारणे व्यक्तीपरत्वे वेगळी असू शकतात. विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचे दडपण, तरुणांसाठी करिअरची चिंता, तर नोकरी करणाऱ्यांसाठी कामाचे टार्गेट्स ही प्रमुख कारणे आहेत. सततच्या तणावामुळे उच्च रक्तदाब, हृदयरोग, निद्रानाश, पचनशक्तीचे विकार आणि मधुमेहासारखे शारीरिक आजार उद्भवतात. मानसिक पातळीवर चिडचिड होणे, नैराश्य आणि एकाकीपणा जाणवणे अशी लक्षणे दिसू लागतात. तणावमुक्तीसाठी काही उपाय तणावाचे व्यवस्थापन करणे ही आजच्या काळाची गरज आहे. खालील काही गोष्टींचा अवलंब करून आपण तणाव कमी करू शकतो: योग आणि ध्यान: दररोज किमान १५-२० मिनिटे योगासने किंवा ध्यान केल्याने मनाला शांती मिळते. शरीराला आणि मेंदूला विश्रांती मिळण्यासाठी ७ ते ८ तासांची शांत झोप आवश्यक आहे. छंद जोपासा: वाचन, संगीत, चित्रकला किंवा बागकाम यांसारख्या आवडीच्या कामात स्वतःला गुंतवून ठेवल्याने तणाव आपोआप कमी होतो. संवाद साधा: मनातल्या भावना जवळच्या मित्रांशी किंवा कुटुंबातील सदस्यांशी बोलून दाखवा. 'मनाचा मोकळेपणा' हा तणावावरचा उत्तम उपाय आहे.

# स्वगणना करणे ही स्व जबाबदारी व प्रगणकाला मदत



**प्रदीप महादेवराव गणोरकर**
शिक्षक जि.प.शाळा करजगांव (गांधीघर), वरुड
मो.क्र.९४२१७३८७४२



भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूची अंतर्गत जनगणना हा विषय आहे. या अनुसूचितील क्रम संख्या ६९ आहे. याची अंमलबजावणी १९४८ अधिनियम अंतर्गत केली आहे. २०२७ च्या जनगणनेची अधिसूचना १६ जून २०२५ ला शासनाने जारी केली. त्या अंतर्गत २०२७ मध्ये ही जनगणना होणार आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा संपूर्ण देशामध्ये एप्रिल २०२६ पासून देशात सुरू झालेली आहे. ही जनगणना दर दहा वर्षांनी भारतीय राज्यघटनेनुसार होत असते. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर जनगणना ही, १९५१, १९६१, १९७१, १९८१, १९९१, २००१ व २०११ यावर्षी झाली.परंतु या जनगणनेत स्वगणना करणे असे सुचित नव्हते. पण या २०२७ च्या जनगणनेमध्ये स्वगणना करणे हा आपल्याला पर्याय दिलेला आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये स्वगणना करण्याचा चा कालावधी १ ते १५ मे असा दिलेला आहे. स्वगणना करणे ही फक्त प्रगणकाला केलेली मदत नसून ही स्वतःची योग्य आणि अचूक माहिती देणे ही स्व जबाबदारी आहे. १६ मे नंतर प्रगणका कडून गावातील जनगणना होणार आहे. देशात स्वातंत्र्यानंतर झालेल्या जनगणना ऑफलाइन पद्धतीने झाल्या. २०२७ ची जनगणना ही डिजिटल पद्धतीने होणार आहे. ही जनगणना एप्रिल २०२६ पासून सुरू झालेली आहे. प्रत्येक कुटुंबाची माहिती घेण्यासाठी प्रगणक हा आपल्या गृहाकडे येईलच. कुटुंबाची जनगणना अंतर्गत कुटुंबातील प्रमुख व्यक्तीने दिलेल्या माहितीवरुन डिजिटल पद्धतीने जनगणना करेल यात शंका नाही काही कुटुंब वगळता प्रत्येक कुटुंबातील एखाद्या व्यक्तीकडे तरी अँड्रॉइड मोबाईल आहे. महाराष्ट्रात सध्या ग्रीष्म ऋतू चालू आहे या ऋतूतील उन्हाची दाहकता ही जिवाची लाही-लाही करणारा आहे. आपण शाळेत असतांना पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञा म्हणताना 'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहे 'असे म्हणत होतो. जीवाची लाही-लाही करणारा ग्रीष्म ऋतूतील तापमान हे प्रगणकाच्या आरोग्याला धोका निर्माण करणार आहे. सर्व भारतीय माझे बांधव आहेत तर आपण प्रगणकाचे आरोग्याची काळजी घेणे, त्याच्या आरोग्याला धोका निर्माण न करणे हे आपले कर्तव्य किंवा जबाबदारी आहे असे मला वाटते. प्रशासनाने प्रगणकांना जनगणना ही एक महिन्यात करण्याची जबाबदारी दिली आहे. राष्ट्रीय कर्तव्य म्हणून प्रत्येक प्रगणक ही जबाबदारी पार पाडेल आणि जनगणना ही शासनाने दिलेल्या कालावधीत पूर्ण पणे होईलच. आपल्याकडे असलेल्या स्मार्टफोन वापरुन आपण वैयक्तिक जीवन, सामाजिक जीवनातील कार्य करतो तर ही १६ वर्षानंतर आलेली जनगणना आपला स्मार्टफोन चा उपयोग करुन का घेत नाही? याची मला खंत वाटते. शासनाने दिलेल्या सर्व सुख सुविधेचा लाभ आपण डिजिटल पद्धतीने केवायसी असो किंवा इतर कार्य असो, आपण स्वतःच्या स्मार्टफोनचा वापर करुन प्रत्येक गोष्ट मिळवण्याचा प्रयत्न करतो. या स्मार्टफोनचा उपयोग करून आपण आपल्या कुटुंबाची प्रमुख म्हणून स्वगणना करून का घेत नाही? असा प्रश्न पडतो. महाराष्ट्र शासनाने आपल्याला १ मे ते १५ मे पर्यंत स्वगणना कुटुंबाची करायची आहे. असे सुचविले आहे. तरी ते आपण करावीच असे बंधन नाही. पण माझ्या मते प्रत्येक कुटुंबातील प्रमुखाने स्वगणना करावी असे मला वाटते. यासाठी शासनाने https:se.cencus.gov.in ही लिंक दिलेली आहे. ही स्वगणना स्वतः आपल्या कुटुंबाची केल्यामुळे जनगणना कर्मचाऱ्यांची वाट पाहण्याची गरज नाही. आपला वेळ वाचेल. नागरिक आपली माहिती स्वतः भरत असल्यामुळे चुकीची माहिती नोंदवली जाण्याची फार शक्यता कमी आहे. तुमच्या कुटुंबातील माहिती थेट ऑनलाइन पोर्टल द्वारे सुरक्षितपणे सबमिट केली जाईल. भारत सरकारच्या डिजिटल इंडियाच्या धोरणाला प्रोत्साहन मिळेल. ही जनगणना डिजिटल असल्यामुळे कागदपत्राचा वापर कमी होतो. तुमचा फॉर्म यशस्वीरित्या सबमिट केल्यावर एक विशिष्ट आयडी तयार होतो. तो भविष्यातील पडताळणीसाठी वापरला जाऊ शकतो. जर तुम्ही स्वतःच्या कुटुंबाची स्वगणना केली नाही तर, प्रगणकला ला माहिती देत असताना एखादी चुकीची माहिती आपण अनावधानाने देऊ शकण्याची शक्यता नाकरता येत नाही. म्हणून स्वतःच्या कुटुंबाची स्वतः स्वगणना केल्यामुळे अचूक अशी माहिती भरल्या जाईल असे मला वाटते. कारण प्रगणक फक्त तुमच्याकडून तुमच्याकडे जे आहे ते विचारणार आहे. तुम्ही माहिती द्याल तीच माहिती नोंदविला जाणार आहे. प्रगणक घरी येईल तेव्हा प्रमुख व्यक्ती घरात नसेल तर इतर व्यक्ती सुद्धा अनावधानाने चुकीचीमाहिती सांगेल. त्यामुळे त्यांच्याकडून एखादी माहिती चुकीची नोंदवल्या जाऊ शकते अशी शंका वाटते. प्रगणक सुद्धा शासनाचा कर्मचारी आहे. त्यांना शासनाचे विविध कार्य शासनाने दिलेल्या कालावधीत पूर्ण करायचे आहे. कौटुंबिक जबाबदारी वेगळी आहे. प्रगणकामध्ये जास्तीत जास्त संख्या ही शिक्षकांची आहे. शिक्षकांच्या डोक्यावर शासनाने दिलेल्या ऑफलाईन व ऑनलाइनचे कार्य डोक्यावर ओझे वाहण्यासारखे झाले आहेत. शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असतो. त्यामुळे प्रगणक शिक्षकाला कुटुंबातील व्यक्तीने स्वगणना केल्यामुळे विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त अध्ययन अनुभव देता येईल. शिक्षका व्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांना सुद्धा आपल्या कार्यालयीन कामांमध्ये गती वाढवता येईल. भारतातील जनतेने स्वगणना करून कर्तव्य किंवा जबाबदारी म्हणून सर्वांना करावी असे वाटते. जर आपण नाही केली तरी प्रगणक आपल्या दारी १६ मे पासून आहेच. भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहे हे वाक्य सार्थ करायचे असेल तर स्वगणना करावी असे वाटते. सुशिक्षित कुटुंबानी तरी स्वतःच्या कुटुंबाची आपण स्वगणना करावी व प्रगणाकाचे काम काही प्रमाणात कमी करून तसेच स्व जबाबदारी समजून जनगणनेच्या कार्यात प्रगणकाला मदतीचा हात द्यावा.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# चालत्या बसमध्ये २ तास महिलेवर सामूहिक अत्याचार

## ७ किलोमीटरपर्यंत बस फिरली, दिल्ली पुन्हा हादरली, अंगावर काटा आणणारी घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**दिल्ली** – राजधानी दिल्लीत एका खासगी बसमध्ये महिलेसोबत सामूहिक अत्याचार झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना १२ मे रोजी घडली आहे. महिलेची तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हा दाखल केला आणि तपास सुरू केला. या प्रकरणी बसचा ड्रायव्हर आणि कंडक्टर या दोघांना अटक करण्यात आली आहे. वैद्यकीय तपासणीनंतर एफआयआर दाखल पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला विवाहित असून तिला तीन मुले आहेत. तक्रार मिळाल्यानंतर महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी एफआयआर नोंदवला. यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करण्यात आली आणि नंतर त्यांना अटक करण्यात आली. दिल्ली पोलिसांनी ती खासगी बस ताब्यात घेतली आहे, ज्यामध्ये महिलेसोबत सामूहिक बलात्काराची घटना घडल्याचा आरोप आहे. तपासात मदत होईल असे पुरावे गोळा करण्यासाठी पोलीस आता बसची फॉरेन्सिक तपासणी करत आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बसच्या आतून आवश्यक नमुने घेण्यात आले असून तांत्रिक पथक संपूर्ण वाहनाची बारकाईने तपासणी करत आहे. यासोबतच बसमधील आणि रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेजही तपासले जात आहे.

# लिंगा ग्रामपंचायतीवर 'घागर मोर्चा'चा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## पाणी टंचाईने नागरिक हैराण, विहीर अधिग्रहणाची मागणी

**वरुड** – तालुक्यातील लिंगा येथे पाणी टंचाई निर्माण झाली असून प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. वारंवार मागणी करुनही ग्रामपंचायत प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत येत्या ७ दिवसांत पाणी समस्या सुटली नाही तर ग्रामपंचायतीवर 'घागर मोर्चा' काढण्याचा इशारा ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

लिंगा गावातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी यापुर्वी एका खासगी विहिरीचे अधिग्रहण करण्यात आले होते. मात्र उन्हाळ्याचा तडाखा वाढल्याने या विहिरीची पाणी पातळी कमालीची खाली गेली आहे. परिणामी, गावाला होणारा पाणीपुरवठा ठप्प झाला असून महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. गावातील नागरिकांनी या समस्येबाबत सचिव यांना अनेकदा तोंडी कळवले. मात्र प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्याऐवजी केवळ उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे. 'उन्हाळ्यात पाण्याची कसरत करावी लागत असतांना अधिकारी गांभीर्याने का घेत नाहीत?' असा सवाल संतप्त ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

ग्रामस्थांनी सरपंच आणि सचिवांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, जर सात दिवसांच्या आत पाण्याचा प्रश्न निकाली निघाला नाही तर गावातील महिला आणि नागरिक ग्रामपंचायत कार्यालयावर रिकाम्या घागरी घेऊन धडक देतील. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीला ग्रामपंचायत प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा पदमाकर शेळके, विश्वेश्वर नासरे, अरविंद कडमधाड, महादेव वडस्कर, भारती कळंबे, संगीता कडमधाड, वैशाली नासरे, विमल शेळके, सुशिला बेले, शकुन कोरडे, कविता शेळके यांच्यासह आदींनी दिला आहे.

# देवेंद्र फडणवीसांची बुलेटवरून 'रॉयल' एन्ट्री

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी थेट दुचाकीवरून विधान भवन गाठल्याने सर्वांच्या नजरा त्यांच्याकडे वळल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशवासीयांना इंधन बचतीचे आवाहन केले होते, त्याला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्र्यांनी हे पाऊल उचलले.

मुख्यमंत्री फडणवीस स्वतः 'रॉयल एनफिल्ड ३५०' ही बाईक चालवत विधान भवनात दाखल झाले. मुख्यमंत्र्यांच्या सोबत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार हे देखील दुचाकीवरून या प्रवासात सहभागी झाले होते. विशेष म्हणजे केवळ मुख्यमंत्रीच नव्हे, तर त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेला ताफादेखील यावेळी दुचाकीवरूनच प्रवास करताना दिसला.

सध्या अनेक मंत्री आणि आमदार इलेक्ट्रिक वाहनांकडे वळत असताना, मुख्यमंत्र्यांनी दुचाकीचा वापर करून एक नवा पर्याय समोर ठेवला आहे. मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी आणि इंधनाचा अपव्यय टाळण्यासाठी दुचाकीचा वापर करणे हा प्रभावी मार्ग असल्याचे या कृतीतून सुचवण्यात आले. राज्याच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीने अशा प्रकारे साध्या पद्धतीने प्रवास केल्याने सामान्य नागरिकांमध्ये इंधन बचतीबाबत सकारात्मक संदेश दिला गेल्याचे बोलले जात आहे.

# प्रयागराज आणि अयोध्येसह ३० जिल्ह्यांमध्ये तब्बल ९४ जणांचा बळी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## तरुण पत्र्याच्या शेडसकट हवेत उडाला : तिकडं राजस्थान, एमपीत भीषण गर्मीचा कहर



**भदोही** – देशात दोन प्रकारच्या हवामानाचा अनुभव येत आहे. बुधवारी, प्रयागराज आणि अयोध्यासह उत्तर प्रदेशातील ३० जिल्ह्यांमध्ये वादळामुळे ९४ लोकांचा मृत्यू झाला. प्रयागराजमध्ये सर्वाधिक १७, तर भदोहीमध्ये १६ मृत्यूंची नोंद झाली. बरेलीत ताशी ८० किमी वेगाने आलेल्या वादळाने एका तरुणाला आणि पत्र्याच्या शेडला उडवून लावले. राज्यातील बांदा शहरात तापमान ४५.अंश पर्यंत पोहोचले. आज (१४ मे) ५१ जिल्ह्यांसाठी तीव्र वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे.

भदोही जिल्ह्यात भीषण वादळात १५ जणांचा मृत्यू उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यात आलेल्या भीषण वादळात १५ जणांचा मृत्यू झाला आणि ८ जण जखमी झाले. या नैसर्गिक आपत्तीत १६ जनावरांचाही बळी गेला. सायंकाळी हवामान अचानक बदलले आणि जोरदार वारे वाहू लागले. या भीषण वादळामुळे जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये झाडे आणि विजेचे खांब कोसळले. भदोहीमध्ये अनेक ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या असून, त्यात १५ जणांचा मृत्यू झाला आहे. भदोहीच्या सुरियावान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खरगसेनपट्टी येथे एका घरावर झाड कोसळल्याने एक महिला आणि तिच्या दोन मुलींचा मृत्यू झाला. औराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत, कोसळणाऱ्या झाडाखाली उभे असलेल्या लोकांचा मृत्यू झाला.

राजस्थानमध्येही तीव्र उष्णता आणि उष्णतेची लाट जाणवत आहे. बुधवारी सलग चौथ्या दिवशी जैसलमेर हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, जिथे तापमान ४६.९ँ उ पर्यंत पोहोचले. हवामान विभागाच्या माहितीनुसार, आज बिकानेर, जोधपूर, जैसलमेर आणि बारमेरमध्ये तीव्र उष्णतेसाठी रेड अलर्ट लागू आहे. १३ जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. मध्य प्रदेशातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट दरम्यान, मध्य प्रदेशातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट पसरली असून, ती १८ मे पर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे.

युवा व्यावसायिक सुधिर बेलसरे यांच्या वाढदिवस निमित्ताने

# बालसुसंस्कार शिबिरातील शिबिरार्थींना एक वेळचे भोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – युवा व्यावसायिक तथा सामाजिक कार्यकर्ते सुधिर बेलसरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयामध्ये सुरु असलेल्या उन्हाळी बालसुसंस्कार शिबिरातील सहभागी शिबिरार्थींना एक वेळचे जेवण देवुन साजरा करण्यात आला.

सुधिर बेलसरे हे गेल्या वर्षांपासुन त्यांचा वाढदिवस अत्यंत साध्या पध्दतीने साजरा करुन विविध उपक्रमांमध्ये सहभाग होत असतात. मागच्या वर्षी सुध्दा त्यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने शिबिरार्थ्यांना एक वेळची पंगत दिली होती. तीच परंपरा कायम ठेवत शिबिरातील १५० हून अधिक चिमुकल्यांसाठी त्यांनी शिबिरार्थींच्या रात्रीच्या भोजनाची व्यवस्था केली होती.

याप्रसंगी प्रा.किशोर तडस, योगेश घारड, लतिक पटेल, भुषण काळे, विक्की ठाकुर, अनुप झोड, विजय लेकुरवाळे, गुणवंत अकर्ते, शिबिराचे आयोजक नितीन खेरडे, उमेश कांडलकर, शेषराव कडू यांच्यासह अन्य उपस्थित होते. सुधिर बेलसरे यांनी राबविलेल्या या नाविण्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र स्वागत केल्या जात आहे.

# व्यावसायिक दीपक कोचर यांना उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा : ईडीच्या 'त्या' कारवाईला स्थगिती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – आयसीआयसीआय बँकेशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात व्यावसायिक दीपक कोचर यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा देताना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ७८ कोटी रुपयांच्या मालमत्तेची जप्ती कायम ठेवणाऱ्या लवादच्या आदेशाला न्यायालयाने नुकतीच स्थगिती दिली.

१९ जूनला होणाऱ्या पुढील सुनावणीच्या तारखेपर्यंत, जप्त केलेल्या मालमत्तेचा ताबा घेण्यापासून खंडपीठाने ईडीला मनाई केली. मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंकड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. दीपक कोचर हे आयसीआयसीआय बँकेच्या माजी मुख्य कार्यकारी अधिकारी चंदा कोचर यांचे पती आहेत. त्यांनी अंतरिम संरक्षणासाठी योग्य कायदेशीर बाजू मांडली आहे, असे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंकड यांच्या खंडपीठाने नमूद केले.

व्यावसायिक दीपक कोचर आणि त्यांच्या पत्नी चंदा कोचर यांच्यावरील कारवाईमुळे खळबळ उडाली होती. दीपक कोचर यांनी आयसीआयसीआय बँकेकडून घेतलेल्या कथित कर्जामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती.

डॉ.मिनाताई बंदे योगा ग्रुप तर्फे

# जागृत महाविद्यालयात योग व प्राणायाम शिबिर

(प्रतीनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्व.माणिकलालजी गांधी जागृत महाविद्यालयात आयोजित विद्यार्थ्यांच्या उन्हाळी संस्कार शिबिरात डॉ.मिना बंदे योगा ग्रुप तर्फे ८ ते १४ मे दरम्यान योग व प्राणायाम शिबिर उत्साहात पार पडले.

डॉ.बंदे दाम्पत्यांच्या सहजीवनाच्या ४१ व्या वर्षपुर्तीच्या मंगलमय निमित्ताने आयोजित या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

योग शिबिराची सुरुवात सुक्ष्म व्यायामांनी करण्यात आली. वॉर्म-अप, जंपिंग, हात-पायांचे रोटेशन, कमरेचे, मनगटांचे, पायांच्या बोटांचे तसेच मानेचे व्यायाम करुन शरीर लवचिक व सशक्त करण्यात आले. त्यानंतर सुर्य नमस्कारासह ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, भुजंगासन, सर्वांगासन, हलासन, अर्धमत्स्येंद्रासन, नौकासन, पवनमुक्तासन, धनुरासन, वज्रासन, पद्मासन, मकरासन, उष्ट्रासन आणि पश्चिमोत्तानासन आदी योगासनांचा सराव घेण्यात आला. प्राणायामामध्ये कपालभाती, अनुलोम-विलोम, भस्त्रिका, भ्रामरी, त्रिबंध तसेच कर्णरोगांतक प्राणायामाचा समावेश होता. संत तुकडोजी महाराजांच्या प्रार्थनेने वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. डॉ.मिना बंदे यांनी विद्यार्थ्यांना नियमित दिनचर्या, शिस्त, एकाग्रता, सकारात्मक विचार आणि निरोगी जीवनासाठी योगाचे महत्त्व याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. लहान मुलांचे मन समजुन घेत त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यावरही त्यांनी विशेष भर दिला.

या उपक्रमात योग प्रशिक्षक म्हणुन डॉ.मिना बंदे यांच्यासह सरिता खेरडे, गायत्री देवते, शालिनी देशमुख, आशा खासबागे, रेखा ठाकरे, किरण उपाध्याय, कल्पना घोरमाडे, प्रीती गुल्हाने, वैशाली देवते, ज्योत्स्ना राऊत, कीर्ती खोडे, प्रतिभा लोखंडे व शैलजा लोखंडे यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांना योग, व्यायाम व आरोग्यदायी सवयी शिकण्याचा हा उपक्रम संस्मरणीय ठरला.

शिव वाहतुक सेना महाराष्ट्र उपाध्यक्षपदी

# गब्बर पठाण यांची नियुक्ती : शिवसैनिकांकडुन जल्लोष

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शिव वाहतुक चालक-मालक सेनेच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी गब्बर पठाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे वाहतुकदारांच्या प्रश्नांना आता राज्यस्तरावर अधिक बळकटी मिळणार असून वरुडसह संपुर्ण जिल्ह्यात शिवसैनिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

आजच्या काळात वाहतुकदारांना एका खंबीर आणि विश्वासार्ह नेतृत्वाची गरज आहे. हीच गरज ओळखुन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतुन ही महत्त्वाची जबाबदारी गब्बर पठाण यांच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. उद्धव ठाकरे यांना अभिप्रेत असणारी सशक्त वाहतुक सेना उभारण्याचे आणि चालक-मालकांच्या न्याय्य हक्कांसाठी सदैव तत्पर राहण्याचे आवाहन पक्षनेतृत्वाद्वारे करण्यात आले आहे.

सदर नियुक्ती सध्या एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे. या कार्यकाळात महाराष्ट्र उपाध्यक्ष म्हणुन गब्बर पठाण यांचा कामाचा झपाटा आणि अहवाल पाहुनच पुढील मुदतवाढीचा निर्णय घेण्यात येणार आहे. या नियुक्तीमुळे संघटनेत नवीन चैतन्य निर्माण झाले असून वाहतुक क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी गब्बर पठाण सक्रीय राहतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गब्बर पठाण यांच्या निवडीबद्दल शिवसेना (उ.बा.ठा.) परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. 'वाहतुकदारांची विश्वासार्हता जपणे आणि त्यांच्या समस्यांना वाचा फोडणे हेच आमचे प्रथम कर्तव्य राहील,' अशी भावना यावेळी नवनियुक्त महाराष्ट्र उपाध्यक्ष गब्बर पठाण यांनी व्यक्त केली.

# चीनमध्ये ट्रम्प-शी जिनपिंग भेट : तैवानवरुन गर्भित इशारा, टॅरिफवरून खडे बोल, प्रतिस्पर्धी नाही, तर.. चीनी राष्ट्राध्यक्षांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचे कान टोचले

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वॉशिंगटन** – अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बीजिंगमध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. शी जिनपिंग यांनी बीजिंगच्या 'ग्रेट हॉल ऑफ द पीपल' येथे ट्रम्प यांचे स्वागत केले. ट्रम्प यांना मानवंदना देण्यात आली आणि दोन्ही नेत्यांनी हस्तांदोलन केले. भेटीच्या सुरुवातीला शी जिनपिंग म्हणाले की, संपूर्ण जग या भेटीकडे पाहत आहे. ते म्हणाले की, जग वेगाने बदलत आहे आणि जागतिक स्थिरतेसाठी अमेरिका–चीन संबंध महत्त्वपूर्ण आहेत. शी जिनपिंग म्हणाले की, दोन्ही देशांनी 'प्रतिस्पर्धी नव्हे, तर भागीदार' बनले पाहिजे. तुमचा मित्र असणे हा सन्मान ट्रम्प यांनी शी जिनपिंग यांची प्रशंसा करत म्हटले, 'तुमचा मित्र असणे हा सन्मान आहे.' ट्रम्प म्हणाले की, अमेरिका आणि चीनमधील संबंध सुधारणार आहेत. ते असेही म्हणाले की, त्यांनी जगातील सर्वात प्रमुख व्यावसायिक नेत्यांना आपल्यासोबत चीनमध्ये आणले आहे. ट्रम्प यांच्या शिष्टमंडळात इलॉन मस्क, ॲपलचे सीईओ टिम कुक आणि बोईंगचे सीईओ यांच्यासह अनेक प्रमुख अमेरिकन व्यावसायिक नेत्यांचा समावेश आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४३४/२०२६ ने.ता.२४/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती निता नंदकिशोर चौरासे, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम, २) कु.वैदही नंदकिशोर चौरासे, वय अं.१४ वर्ष, धंदा- शिक्षण, (अर्जदार क्र.१ हिने स्वत:करीता व अ.पा.क आई म्हणून अर्जदार क्र.२ तर्फे सही केली असे) क्र.१ व २ रा.आमनेर, ता.वरुड, ह.मु.बोहरा कब्रस्थान जवळ, प्लॉट नं.३२ इंदिरा गांधी नगर, आंबेडकर मार्ग, नागपूर, ता.जि.नागपूर, पिन-४४००१७

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** १) श्रीमती रेखाबाई मोतीरामजी चौरासे, वय अं.६५ वर्ष, धंदा- घरकाम, २) श्री.प्रदिप मोतीरामजी चौरासे, वय अं.४७ वर्ष, धंदा-, क्र.१ व २ रा.आमनेर, ता.वरुड, ह.मु.बोहरा कब्रस्थान जवळ, प्लॉट नं.३२, इंदिरा गांधी नगर, आंबेडकर मार्ग, नागपूर

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत मोतीराम बारकाजी चौरासे, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०६/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४२१/२०२६ ने.ता.१९/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती जयवंताबाई माणिकराव हरले, वय अं.७९ वर्ष, धंदा-घरकाम, २) विजय माणिकराव हरले, वय अं.५२ वर्ष, धंदा- व्यवसाय, क्र.१ व २ रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ३) चंदा दिपक सोनागोले, वय अं.४८ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.जगदीश नगर, काटोल रोड, नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत माणिकराव गणपतराव हरले, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४३१/२०२६ ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-**

प्रकाश रमेश निंभोरकर

वय अं.३३ वर्ष, धंदा-खासगी नोकरी

रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रेखा रमेश निंभोरकर, रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**जे.एस.ठाकरे मॅडम, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४२९/२०२६ ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) माणिक सुर्यभानजी सुरजुसे, वय अं.६७ वर्ष, धंदा-घरकाम, २) अरुण सुर्यभानजी सुरजुसे, वय अं.५५ वर्ष, धंदा- मजुरी, ३) दुर्गा ज्ञानेश्वर सुरजुसे, वय अं.४० वर्ष, धंदा-घरकाम, ४) ईश्वर ज्ञानेश्वर सुरजुसे, वय अं.०५ वर्ष, धंदा-काही, (अ.पा.क आई अर्जदार क्र.४ तर्फे अर्जदार क्र.३) सर्व रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत सुर्यभान सिताराम सुरजुसे व मयत कमला सुर्यभान सुरजुसे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१३/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मतीन पटेलच्या घरावर बुलडोझर : नाशिक टीसीएस प्रकरणातील आरोपी निदा खानला आश्रय देणे भोवले

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***पुणे***– देशभर गाजत असलेल्या नाशिक 'टीसीएस' कंपनी धर्मांतर प्रकरणी शहरात बुधवारी मोठी कारवाई करण्यात आली. या प्रकरणातील मास्टर माईंड निदा खान हिला आश्रय देणाऱ्या एमआयएम नगरसेवक मतीन पटेल याचे नारेगावातील अनधिकृत घर महापालिकेने जमीनदोस्त केले. मनपा अतिक्रमण विभागाचा मोठा फौजफाटा सकाळी ६ वाजताच नारेगावात दाखल झाला. निदा खान लपली होती ते घर जेसीबीने जमीनदोस्त करण्यात आले. दरम्यान, मतीन पटेलच्या नातलगांनी मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्यासह येथे आलेल्या पथकाचे हार–फुले देत स्वागत केले. टीसीएस नाशिकमधील कंपनीतील धर्मांतर प्रकरणातील आरोपी निदा खानला ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली. मतीन पटेलने तिला आपल्या घरात आश्रय दिला होता. त्यानंतर ९ मे रोजी महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाबाबत त्याला नोटीस बजावली होती आणि ७२ तासांत उत्तर मागितले होते. अखेर मतिन पटेलच्या त्या घरावर देखील बुलडोजर फिरविण्यात आला. आणखी अलिशान घर बांधू : जलील संतापले एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी तेथील नागरिकांशी संवाद साधला आणि महानगरपालिकेच्या कारवाईत अडथळा आणू नका असे आवाहन केले. ते म्हणाले, तुमच्या प्रेमामुळे मोठी ताकद निर्माण झाली आहे. भाजपाच्या निवडून आलेल्या नगरसेवकांच्या बेकायदेशीर बांधकामांचे इतके पुरावे आहेत की त्यामध्ये महानगर पालिकांच्या अतिक्रमण विभागाने लिहून दिलेय की हे अनधिकृत आहे, ते तोडले पाहिजे, नगरसेवकांवर कारवाई केली पाहिजे.

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-१४६/२०२५-२६ दि.०४/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **शाहेन शाह मौला शाह, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे शाहेन शाह मौला शाह, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०१/०१/१९८८** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म-मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०४/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-१४७/२०२५-२६ दि.०४/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **बतुन बी मौला शाहा, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **मुलगा नामे मुन्नीबी मौला शाहा, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.३०/०६/१९८५** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म-मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०४/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-१६९/२०२५-२६ दि.०४/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **बतुन बी मौला शाहा, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **मुलगा नामे मुस्ताक शाह मौला शाहा, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१८/०७/१९८३** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म-मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०४/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-१७९/२०२५-२६ दि.०५/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **जगदीश मारोतराव दहीवाडे, रा.पळसवाडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत पळसवाडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे जगदीश मारोतराव दहीवाडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०३/०८/१९६८** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म-मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०५/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

# सोन्या-चांदीवरील आयात शुल्क दुप्पट

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - देशातील परकीय चलन साठ्यावरील ताण कमी करण्यासाठी आणि घसरणाऱ्या रुपयाला सावरण्यासाठी केंद्र सरकारने बुधवारी सोन्या-चांदीच्या आयात शुल्कात दुपटीहून अधिक वाढ केली आहे. सोन्या-चांदीवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्के करण्यात आले आहे. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे



कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने निर्माण झालेल्या आर्थिक आव्हानांचा सामना करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. बुधवारी डॉलरच्या तुलनेत रुपया ९५.७१ या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर बंद झाला. मंगळवारी तो ९५.७५ पर्यंत घसरला होता. पश्चिम आशियातील संकटामुळे कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल १०७ डॉलरवर पोहोचले आहेत. खते आणि तेलाच्या आयातीसाठी परकीय चलन वाचवणे सरकारसाठी अत्यावश्यक झाले आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सोन्या-चांदीची आयात २६.७ टक्क्यांनी वाढून १०२.५ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे.

# सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बदल्या समुपदेशनाद्वारे

## आरोग्य विभागाचे वेळापत्रक जाहीर

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांसाठी समुपदेशन प्रक्रियेला गती देत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. सार्वजनिक आरोग्य व




कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पारदर्शक व त्यात सुसूत्रता आणण्यात भर देण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय १५ एप्रिलनुसार समुपदेशनाद्वारे सर्वसाधारण बदल्या करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून त्या अनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा यांनी ८ परिमंडळातील सर्व कार्यक्रम प्रमुख यांच्या बदल्यांचे टप्प्याटप्प्याने वेळापत्रक जाहीर केले आहे. रिक्त पदांची यादी ६ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर बदलीपात्र कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी ८ मे रोजी प्रसिद्ध केली तसेच प्रपत्र १ ते ५ तयार करून नागरी सेवा मंडळासमोर १० मे रोजी सादर केली. मंडळाकडून समुपदेशनाने बदलीचे अंतिम प्रस्ताव १५ मे पर्यंत पाठवण्यात येणार आहेत. दुर्गम भागातील सेवेला विशेष महत्त्व या नव्या धोरणानुसार बदल्या करताना सेवा कालावधी, प्राधान्यक्रम, पसंतीक्रम, प्रशासकीय गरज तसेच दुर्गम भागातील सेवेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

# पास विद्यार्थांपेक्षा जागा अधिक

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – शिक्षण संचालनालयाने दहावी निकालानंतर राज्यातील अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. मुंबई विभागात अकरावी प्रवेशासाठी यंदा ४ लाख ७६ हजार जागा २५० जागा उपलब्ध आहेत. यामध्ये ठाणे जिल्ह्यात १ लाख ६० हजार ८४० जागांचा समावेश आहे. यंदा उपलब्ध जागांच्या तुलनेत कमी विद्यार्थी दहावी परीक्षेत पास झाले असल्याने यंदाही अकरावीच्या अनेक जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.

# घरात घुसून महिलेचा विनयभंग

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## वरुड पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल

**वरुड** – घराचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधुन एकाने घरात शिरुन महिलेचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. पीडितेने आरडाओरडा केल्यामुळे तिचा पती धावुन आला. पतीला पाहताच आरोपीने घटनास्थळावरुन पळ काढला. या प्रकरणी वरुड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही रात्री आपल्या घरात झोपलेली होती. घराच्या समोरील दरवाजाची कडी ढिली असल्याचा फायदा घेत आरोपी प्रदीप जानराव ठवळे (५०) याने चोरट्या पावलाने घरात प्रवेश केला. महिला गाढ झोपेत असतांना आरोपी प्रदीपने विनयभंगाच्या उद्देशाने पीडितेच्या छातीला स्पर्श करुन तिची छेड काढली.

अचानक झालेल्या या प्रकारामुळे महिला दचकुन जागी झाली आणि तिने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. पत्नीचा आवाज ऐकताच तिचे पती तातडीने धावुन आले. पतीला समोर पाहताच आरोपी प्रदीपने तिथुन पळ काढला.

या प्रकरणी ३० वर्षीय फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी आरोपी प्रदीप जानराव ठवळे (५०) याचे विरुद्ध विनयभंग आणि घरात अनाधिकृत प्रवेश केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

# बँक परिसरातुन १ लाख ९० हजारांची रोकड लंपास

## शहरातील युनियन बँक ऑफ इंडियाच्या शाखेसमोरील घटना

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – बँकेतुन शेतीकामासाठी काढलेले १ लाख ९० हजार रुपये दुचाकीला लटकवुन फळ खरेदी करणे एका शेतकऱ्याला चांगलेच महागात पडले. ही संधी साधुन अज्ञात चोरट्याने पैशांची पिशवी लंपास केल्याची घटना युनियन बँक ऑफ इंडियाच्या शाखेसमोर घडली. या प्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरु केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनिल तुळशिरामजी वऱ्हेकर (६५), रा.सावता चौक, वरुड हे आपल्या शेतीकामासाठी पैशांची सोय करण्याकरीता युनियन बँक ऑफ इंडियाच्या वरुड शाखेत गेले होते. त्यांनी बँकेतुन १ लाख ९० हजार रुपये काढले आणि ते एका पिशवीत भरुन आपल्या मोपेड मोटारसायकल क्रमांक एम.एच.३१ के.आर.७१०३ ला लटकवले. बँकेबाहेरच फळे खरेदी करण्यासाठी फिर्यादी अनिल थांबले असता त्यांचे लक्ष विचलित झाल्याची संधी साधुन अज्ञात इसमाने दुचाकीला लटकवलेली रोख रकमेची पिशवी चोरुन नेली. काही वेळाने पिशवी गायब असल्याचे लक्षात येताच शेतकऱ्याचे धाबे दणाणले. परिसरात शोधाशोध केली असता चोरट्याचा सुगावा लागला नाही.

या प्रकरणी फिर्यादी अनिल तुळशिरामजी वऱ्हेकर (६५), रा.सावता चौक वरुड याच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

# नीट पेपरफुटीः पुण्यातून महिलसह पाच ताब्यात

## कोचिंग क्लासेस, डॉक्टर्स यांचाही सहभाग?

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे, अहिल्यानगर** – देशभरात गाजलेल्या 'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता महाराष्ट्रापर्यंत पोहोचले असून याप्रकरणी अहिल्यानगर, पुणे पोलीस आणि सीबीआयने केलेल्या संयुक्त कारवाईत एका ४६ वषीय महिलेसह चौघांना ताब्यात घेतल्याने या रॅकेटचे मोठे जाळे उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या प्रकरणात सीबीआयकडून मिळालेल्या माहितीनुसार वेगवगेळी पथके तयार करून तांत्रिक माहिती आधारे तपास सुरू करण्यात आला. पुण्यातील सुखसागरनगर परिसरातून मनीषा संजय वाघमारे (४६) या महिलेला ताब्यात घेण्यात




आले आहे. मनीषा वाघमारे या व्यवसायाने ब्युटीशियन असून त्यांचे स्वतःचे ब्युटी पार्लर आहे. तर त्यांचे पती डेंटिस्ट असून त्यांचे क्लिनिक आहे.

अहिल्यानगर येथून अटक करण्यात आलेला या प्रकरणातील मुख्य एजंट धनंजय लोखंडे याच्या चौकशीतून मनीषाचे नाव पुढे आले होते. मनीषा ही विद्यार्थ्यांना हेरून त्यांना मुख्य एजंट धनंजय लोखंडेपर्यंत पोहोचवण्याचे काम करत असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. बुधवारी पहाटे करण्यात आलेल्या या अत्यंत गोपनीय कारवाईत पोलिसांनी मनीषाच्या घरून तिचा मोबाईल फोन आणि लॅपटॉप जप्त केला आहे. या तांत्रिक पुराव्यांच्या प्राथमिक तपासणीत धनंजय लोखंडे आणि मनीषा वाघमारे यांच्यात अनेक संशयास्पद व्हॉट्सअॅप कॉल्स आणि टेलिग्राम मेसेजेसची देवाणघेवाण झाल्याचे रेकॉर्ड पोलिसांच्या हाती लागले आहेत.

शुभमचा जबाबा रॅकेटमधील महत्त्वाचा दुवा असलेला धनंजय लोखंडे (२६) हा मूळचा राहुरी तालुक्मयातील माहेगावचा रहिवासी असून, तो गेल्या चार वर्षांपासून पुण्याच्या वाघोली परिसरात वास्तव्यास होता.

## मुख्याधिकाऱ्यांवर दबाव टाकत अंगावर धावुन जाणाऱ्या

# चौघांविरुद्ध शेंदुरजनाघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शेंदुरजनाघाट नगर परिषद कार्यालयात एका इसमाने विष प्राशन करण्याचा बनाव करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला तर त्यानंतर त्याच्या भावांनी कार्यालयात येऊन अधिकाऱ्यांवर दबाव टाकत धक्काबुक्की केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी प्रकाश वघाळे याने नगर परिषद कार्यालयात बेकायदेशीरपणे उपोषण सुरु केले होते. यामुळे कार्यालयातील कर्मचाऱ्यांना त्यांचे दैनंदिन कामकाज करणे कठीण झाले होते. उपोषणादरम्यान आरोपी प्रकाशने फिर्यादी मुख्याधिकारी गजानन विठ्ठलराव भोयर यांच्या केबिनसमोर एका खाकी पाकिटातुन काहीतरी पुडी काढुन तोंडात टाकली आणि खाली कोसळला. विषप्राशन केल्याच्या संशयावरुन कर्मचाऱ्यांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावुन त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. ही घटना घडुन एका तासानंतर आरोपी प्रकाशचे तीन भाऊ गुणवंत वघाळे, रुपेश वघाळे व गोपाल वघाळे, सर्व रा.मलकापुर, शें.घाट हे कार्यालयात शिरले. त्यांनी त्यांचे बेकायदेशीर आणि नियमबाह्य कामे करण्यासाठी फिर्यादी गजानन यांचेवर दबाव टाकण्यास सुरुवात केली. वादावादी वाढल्यानंतर आरोपींनी फिर्यादी गजानन यांचा हात धरुन ओढला आणि त्यांच्या अंगावर मारण्यास धावुन गेले. या अनपेक्षित प्रकारामुळे नगर परिषद परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

शासकीय कामात अडथळा आणणे, लोकसेवकाला मारहाण करण्याचा प्रयत्न करणे आणि दबावतंत्राचा वापर करणे, या प्रकरणी फिर्यादी मुख्याधिकारी गजानन भोयर यांच्या तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी आरोपी प्रकाश वघाळे, गुणवंत वघाळे, रुपेश वघाळे व गोपाल वघाळे, सर्व रा.मलकापुर, शें.घाट याचेविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली शेंदुरजनाघाट पोलिस करीत आहे.

